आपलं महानगर

# तीन हजारांहून अधिक जागांवर तात्काळ वीजमीटर, एईएमएलची कामगिरी

खास प्रतिनिधी • मुंबई

मुंबई सध्या करोनासाठी देशातला केंद्रबिंदू बनली आहे. मोठ्या प्रमाणावर विलगीकरण आस्थापने उभारणे ही गरज झाली आहे. अनेक रिकाम्या इमारती तसेच कोणाचाही निवास नसलेल्या संकुलांचे रूपांतर विलगीकरण आस्थापनांमध्ये करण्यात आले आहे. अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड सरकारच्या दमदार मदतीने या विलगीकरण आस्थापनांमध्ये आपत्कालीन तत्त्वावर वीजजोडण्या व वीजपुरवठा करत आहे, कारण यातील बहुतेक जागांवर आतापर्यंत वीजजोडण्या नव्हत्या.

अदाणी इलेक्ट्रिसिटी पश्चिम व पूर्व भागातील आपल्या कक्षेत येणाऱ्या सर्व प्रभावित क्षेत्रांना प्राधान्यतत्त्वावर अखंडित वीजपुरवठा करत आहे. यांमध्ये शिवाजी नगर येथील मॅटर्निटी केअर सेंटर, अंधेरीतील मुंबई महानगरपालिका रुग्णालय आणि विलगीकरणाखाली असलेल्या अन्य काही निवासी भागांचा समावेश होतो. महानगरपालिका, जिल्हाधिकारी, नागरी संरक्षण संचालनालय आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) यांच्या सहकार्याने एईएमएलने शहरातील वीजजोडणी नसलेल्या अनेक आस्थापनांना वीजजोडण्या दिल्या आहेत.

सरकारने विलगीकरणाच्या हेतूने निश्चित केलेल्या आस्थापनांना आमच्या प्रत्यक्ष क्षेत्रावर काम करणाऱ्या पथकांनी आमच्या वितरण क्षेत्रातील २९५७ फ्लॅट्सना वीजपुरवठा सुरू केला आहे. अतिरिक्त ४५५ फ्लॅट्सना वीजपुरवठा सुरू करण्याच्या प्रक्रियेत आम्ही आहोत. फ्लॅट्सशिवाय आम्ही ५०० खाटांची क्षमता असलेल्या ९ रुग्णालयांना तसेच वर्सोवा मैदानावर महाराष्ट्र होमगार्ड्सने बांधलेल्या ५०० जणांना सामावण्याची क्षमता असलेल्या ३०,००० चौरस फूट जागेतील शिबिरालाही वीजपुरवठा सुरू केला आह असे वीजपुरवठा करण्याविषयी एईएमएलचे प्रवक्ते म्हणाले.

या साथीच्या काळात अदाणी इलेक्ट्रिसिटीचे अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी अविश्रांत काम करत आहेत. अत्यंत निस्वार्थ भावाने सेवा देणारे ते खरेखुरे नायक आहेत. जनतेला सुरक्षितपणे जगणे शक्य करून देणे आणि लॉकडाउनच्या काळात मुलभूत गरज झालेला वीजपुरवठा त्यांना अखंडितपणे उपलब्ध करून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. जनतेला सुरक्षित व खात्रीशीर वीजपुरवठा करण्याच्या कामात गुंतलेल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तसेच कल्याणासाठीही एईएमएल सक्रियपणे काम करत आहे. कर्मचाऱ्यांना कामावर येण्यासाठी वाहतूक सुविधा दिली जात आहे, त्यांना दिवसातून ३ वेळा जेवण दिले जात आहे. त्याचप्रमाणे स्वच्छतेसाठी आवश्यक साधने, मास्क, हातमोजे आदी सर्व संरक्षक उपकरणे पुरवून त्यांना सुसज्ज ठेवले जात आहे.